**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य,**
**मध्यवर्ती इमारत, पुणे ४११ ००१**

Web : www.dhepune.gov.in, E-Mail : prash.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्र.ममअ-२०१४/विपप्र/१६१९/प्रशा-१ | 10836 दिनांक. १८.१२.२०१४

18 DEC 2014

प्रति,

१. सर्व कुलगुरु,
अकृषी विद्यापीठे

२. सर्व विभागीय सहसंचालक,
उच्च शिक्षण

३. सर्व प्राचार्य/संचालक,
शासकीय कला, वाणिज्य, विज्ञान व विधी महाविद्यालये/
शासकीय अध्यापक महाविद्यालये/
शासकीय विज्ञान संस्था/न्यायसहाय्यक विज्ञान संस्था

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
24 DEC 2014
क्रमांक क्र ...... 593

SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY
Vice-Chancellor's Office
Inward No....... 03
Date... 1 JAN 2015
To whom Maked.......
Section.......

PA to V.C. 24/12 DR(Deuel) 02/01/15

विषय : रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनेबाबत...

संदर्भ :
१. राघवन समितीच्या शिफारशी
२. शासन परिपत्रक क्रमांक.संकीर्ण २००५/(२३८/०५)/विशि-१, दि.१८.०७.२००७
३. स्पेशल लिव्ह ॲपिल क्रमांक२४२९५/२००४ मध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक.१६.०५.२००७ रोजी दिलेले अंतरित आदेश .
४. यू.जी.सी. चे परिपत्रक दिनांक.१७.०६.२००९

विषयांकित प्रकरणी वरील संदर्भांचे अवलोकन व्हावे. सुलभ संदर्भास्तव अ.क्र. १ ते ४ संदर्भिय प्रती अ.क्र. १ ते ५८ सोबत जोडलेल्या आहेत.

राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांमध्ये रॅगिंगच्या प्रकारांना प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९ लागू केलेला आहे. त्याचप्रमाणे संदर्भ क्र.१ च्या राघवन समितीच्या शिफारशींच्या व मा.सर्वोच्च न्यायालयाचे संदर्भ क्र.३ अन्वये दिलेल्या आदेशांच्या अनुषंगाने शासनाने संदर्भ क्र.२ चे परिपत्रक निर्गमित केलेले आहे. प्रस्तुत निर्णय व शासन परिपत्रकान्वये भविष्यात रॅगिंगच्या घटना घडू नयेत याकरिता व्यापकस्वरूपात जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यामुळे सर्व शासकीय महाविद्यालये/विज्ञान संस्था तसेच सर्व अकृषी विद्यापीठे व त्यांचेशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांनी, मान्यताप्राप्त संस्थांनी उपरोक्त संदर्भ त्याचप्रमाणे महाराष्ट्र रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९ बाबतची माहिती विद्यार्थ्यांना करुन देऊन विद्यार्थ्यांमध्ये रॅगिंगचे प्रकार प्रतिबंधित करण्याच्या दृष्टीने विस्तृतस्वरुपात जागृती करावी व त्यासाठी खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात यावी.

१. रॅगिंगविरोधी चळवळ सुरु ठेवण्याचे दृष्टीने महाविद्यालयाचे माहितीपत्रक व प्रवेशासंबंधीच्या तत्सम प्रकाशनांद्वारे रॅगिंग विषयीच्या शिक्षेबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत. रॅगिंगमध्ये सहभाग घेतलेल्या विद्यार्थ्यास



D25 5/1/15 D67 3/1/15 डॉ. प्रशांत ..., Biotech Dr ... 14/1/15

त्यांची बाजू मांडण्याची संधी द्यावी, त्यांचे म्हणणे असमाधानकारक वाटल्यास त्यास महाविद्यालयातून/विद्यापीठातून निलंबित करावे. अशाप्रकारे शिक्षा झालेल्या विद्यार्थ्यांची नोंद महाविद्यालयातील माहितीपत्रकात नमूद करावीत.

विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेने प्रवेशासाठी छापलेल्या पुस्तिकेमध्ये (prospectus) असे स्पष्टपणे नमूद करावे की, प्रवेशासाठी येणारा विद्यार्थी यापूर्वी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला असेल तर त्याला प्रवेश नाकारण्यात येईल किंवा प्रवेश दिल्यानंतरही असे निदर्शनास आले की, सदर विद्यार्थी रॅगिंग करण्यामध्ये गुंतलेला होता तर त्याला निष्काशित करण्यात येईल.

२. विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेमध्ये रॅगिंग प्रतिबंध समित्या (ॲन्टि रॅगिंग कमिटी) आणि पथके (ॲन्टि रॅगिंग स्क्वॉड) तातडीने स्थापन करावीत. रॅगिंगविरोधी समिती आणि पथक महाविद्यालयात नियुक्त करून त्या सर्व सदस्यांची नावे, पत्ते व दूरध्वनी क्रमांक प्रसिध्द करावेत. या समित्यांमध्ये स्थानिक नागरिक, पोलिस प्रशासन, प्रसार माध्यमे, अशासकीय स्वयंसेवी संस्थांच्या प्रतिनिधींबरोबरच महाविद्यालयीन शिक्षक, पालक, शिक्षकेत्तर सेवक व विद्यार्थ्यांचाही प्रतिनिधित्व असावे. या समितीचे प्रमुख प्राचार्य/संचालक असावेत. ॲन्टि रॅगिंग स्क्वॉड हे पर्यवेक्षणाच्या कामात सतर्क असेल व यामध्ये बाहेरील व्यक्तिचा समावेश असणार नाही.

३. समुपदेशन वर्ग व ओरीएन्टेशन कोर्सेसद्वारे नविन आलेल्या व वरिष्ठ विद्यार्थ्यांचे प्रबोधन करावे. सर्व विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थांनी प्रवेशाचे वेळी तज्ञ/व्यावसायिक समुपदेशकांमार्फत नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन करावे.

४. रॅगिंगमध्ये दोषी आढळलेल्या विद्यार्थ्यांना शिक्षा देऊन झालेल्या शिक्षेबाबत व्यापक प्रसिध्दी द्यावी.
उदा. अ. स्कॉलरशिप व तत्सम आर्थिक लाभ देण्याचे थांबविणे
ब. महाविद्यालयातून निलंबित करणे
क. निकाल थांबविणे
ड. वसतिगृहातून निलंबित करणे, इत्यादी.

५. महाविद्यालय सुरु होताना दृकश्राव्य माध्यमांच्या मदतीने रॅगिंग प्रतिबंधाबाबत विद्यार्थ्यांचे प्रबोधन करावे.

६. विद्यार्थी संघटनांमध्ये रॅगिंगच्या वाईट परिणामांची व तत्संबंधी होणाऱ्या शिक्षेबाबतची जाणीव जागृती करावी.

७. विद्यार्थी व पालक यांचेकडून रॅगिंगमध्ये सहभाग होणार नाही अथवा त्याचे समर्थन करणार नाही अशा आशयाचे प्रतिज्ञापत्र घ्यावे.

८. विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थिनींकडून रॅगिंग संदर्भातील हमीपत्र घेताना मा.सर्वोच्च न्यायालय, विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाकडून देण्यात आलेल्या निर्देशांचे पालन करावे.

९. वसतिगृहाती प्रवेश अत्यंत काळजीपूर्वक द्यावेत. वसतिगृहात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे स्वतंत्र समुपदेशन आयोजित करण्यासाठी वसतिगृह प्रमुखांनी पुढाकार घ्यावा.

१०. ज्या विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेमध्ये रॅगिंगच्या घटना वारंवार घडल्याच्या नोंदी होतील व जी विद्यापीठ/महाविद्यालय/संस्था याबाबत उपाययोजना करणार नाहीत त्यांचे यु.जी.सी व अन्य संस्थांकडून मिळणारे अनुदान थांबविण्यात येईल. संबंधित संस्थेचे प्राधिकारी आणि कार्यकर्ते यांची रॅगिंगला प्रतिबंध करण्याची सामुदायिक जबाबदारी राहील. शैक्षणिक संस्थेने रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी

परिणामकारक उपाययोजना केली किंवा नाही याची शासनाला तपासणी करता येईल आणि जर त्यामध्ये त्यांनी योग्य ती कार्यवाही केली नसेल तर राज्य शासनाकडून अनुदान नाकारण्यासारखी कारवाई केली जाऊ शकेल.

११. रॅगिंगला प्रतिबंध करण्यासाठी विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थेमध्ये तत्संबंधीचा आशय असलेले बॅनर, बिल बोर्ड अथवा होर्डिंगस् महाविद्यालयात, वसतिगृहामध्ये कॅन्टिनमध्ये लावावेत.

१२. मा. सर्वोच्च न्यायालयाने सुचविलेल्या रॅगिंग प्रतिबंधात्मक उपाययोजनांबाबतच्या वरील शिफारशी व विद्यापीठ अनुदान आयोगाने यासंदर्भात प्रसिध्द केलेल्या नियमांची अंमलबजावणी करणे सर्व विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थांना बंधनकारक असेल. त्याचप्रमाणे रॅगिंग विरोधी सर्व नियमांची अंमलबजावणी आपल्यास्तरावरुन काटेकोरणपणे करणे बंधनकारक आहे याची कृपया सर्व विद्यापीठ/महाविद्यालय/संस्थांनी नोंद घ्यावी व आपले स्तरावरुन करण्यात येत असलेल्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तात्काळ संचालनालयास सादर करावा.

सर्व विभागीय सहसंचालक यांनी संदर्भात नमूद केलेल्या शासन निर्णय, मा. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय व या सूचनांनुसार कार्यवाही करुन घ्यावी. महाविद्यालयास कोणत्याही शासकीय कारणाने भेट दिल्यास यासंबंधीचा आढावा घ्यावा. विद्यापीठाच्या कुलगुरु महोदयांशी, विद्यापीठातील संबंधित प्राधिकारणाशी याबाबतचा अहवाल मागवावा. याप्रमाणे सूचना देणेचा उद्देश असा आहे की, प्रतिबंधात्मक उपाययोजना कार्यान्वित असली पाहीजे. दुर्दैवाने काही प्रकार घडल्यास तात्काळ कारवाई झाली पाहीजे. तरी वैयक्तिक दर तीन महिन्यांनी माहिती घ्याव व अहवाल सादर करावा.

१८।१२।२०१५

(डॉ.प्र.रा.गायकवाड)
प्र.शिक्षण संचालक, उच्च शिक्षण,
महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

-----

Ragging च्या बाबतीत तक्रार प्राप्त झाल्याच्या चोवीस तासात कार्यवाही करून nodal officer anti ragging, यांना इमेल, फ़ोन ने संपूर्ण माहिती कळविण्यात यावी.

Nodal officer Anti Ragging